41

# जागतीकीरणाचा भारतीय राजकारणावरील प्रभाव

**प्रा.डोंगरे एल.बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
हु.ज.पा.महाविद्यालय, हिमायतनगर
ता.हिमायतनगर जि.नांदेड
dlb_८१ @rediffmail.com

---

विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारण आणि अर्थकारणात आमुलाग्र परिवर्तनाची चळवळ सुरू झाली. या आर्थिक परिवर्तनाची चळवळीची कारणे सोव्हिएत संघराज्याचे विभाजन, पुर्व युरोपात साम्यवादाची पिछेहाट, अमेरिकेची एकध्रुवीय अर्थव्यवस्था अशा राजकीय, आर्थिक, परिवर्तनाचा परिपाक म्हणुन नविन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था उदयास आली. अशा नविन अर्थव्यवस्थेचे प्रतिबिंब म्हणजे जागतिकीकरण होय. आधुनिक काळातील विज्ञान तंत्रज्ञानातील क्रांती, अत्याधुनिक साधने, संदेश वहन आणि माहिती तंत्रज्ञान यामुळे कोणतीही व्यक्ती, कोणतेही राष्ट्र क्षणात संपर्क साधू शकते त्यामुळे जग हे एक खेडे **(Global Village)** झाले आहे. ब्रिटेन हुड्स, गॅट **(General Agreement Tarrif and Trade)** जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक व्यापार संघटना इत्यादींच्या माध्यमातून जागतिकीकरणाची प्रक्रिया अधिक गतीमान झाली. अशा जागतिकीकरणाचा राष्ट्र राज्य व्यवस्थेवर व्यापक असा प्रभाव पडला आहे. जागतिकीकरणामुळे आर्थिक विकासाला प्रेरणा मिळुन मुक्त व्यापार, मुक्त बाजारपेठ आणि भांडवलाच्या गुंतवणुकीचा मार्ग मोकळा होवून राष्ट्र परस्परावलंबी बनली आहेत.

**जागतिकीकरणाचा भारतीय राजकारणावरील प्रभाव**

राष्ट्रवादी क्रांतीकारकांच्या बलिदानातून भारत हा ब्रिटीशांच्या जोखडातून **१५ ऑगस्ट १९४७** रोजी स्वातंत्र झाला. राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या विचारधारेवर आधारीत लोकशाही समाजवादी राष्ट्राची उभारणी करण्यांत आली. या राष्ट्र पुरूषांचे स्वप्न साकार होण्याआधीच भारताला आंतरराष्ट्रीय आर्थिक परिवर्तनाचा परिपाक म्हणुन जागतिकीकरणाचा गांभीर्यपुर्वक विचार करावा लागला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी **(IMF)** जागतिक बँक यांच्या दबावामुळे लोकशाही समाजवादी भारताला मिश्र अर्थव्यवस्थेचा त्याग करुन मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार करावा लागला. **०१ जानेवारी १९९१** रोजी तत्कालीन पंतप्रधान पि.व्ही.नरसिंहराव व तत्कालीन अर्थमंत्री व सध्याचे पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांनी **(नविन आर्थिक धोरण)** या नावाने एक मसुदा तयार करुन संसदेत पारीत करण्यांत आला. या नविन आर्थिक धोरणाने भारताची अर्थव्यवस्था, बाजारपेठ, व्यापार खुला होवून जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. तेंव्हापासून भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार करुन समाजवादी अर्थ व्यवस्थेला सुरूंगच लावला आहे. अशा या जागतिकीकरणाचा भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक घटकांवर व्यापक असा प्रभाव पडला आहे.

१) जागतिकीकरणाचा पहिला प्रभाव असा झाला की, परदेशी उत्पादने व सेवा यांच्या मुक्त प्रवेशामुळे **न्या नफा ना तोटाछ** या तत्वावर सुरू झालेले भारतीय उद्योगधंदे बंद पडली आहेत. तर कांही बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे एक प्रकारची अनियंत्रीत भांडवलशाही निर्माण झाली आहे. त्यामुळे जनहिताचे निर्णय सरकार स्वतंत्रपणे घेवू शकत नसल्याने भारताच्या सार्वभौमत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

२)    जागतिकीकरणाचा दुसरा प्रभाव असा झाला की, भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात नमुद असलेल्या समाजवादी राज्याच्या संकल्पनेस बगल देवून राज्यकर्त्यांनी नविन आर्थिक धोरणाव्दारे भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली आहे. याचा परिणाम असा झाला **B.A.L.Co., H.P.C.L., B.P.C.L., V.S.N.L., N.A.L.Co., Shipping Corporation of India**, या सार्वजनिक क्षेत्राचे सरकारने केलेले खाजगीकरण घटनेच्या संविधानिक मुल्यांची पायमल्ली करणारे आहे. या सार्वजनिक क्षेत्राच्या खाजगीकरणा बाबत भारताच्या महालेखा परिक्षकाने आपल्या अहवालात असे परखडपणे नमुद केले आहे या मालमत्तांची नमुद केलेली किंमत आणि त्या मालमत्तांची वास्तविक किंमत यात जमीन असमानचा फरक आहे. अशा प्रकारे सरकारने बहुराष्ट्रीय कंपन्यांशी अभद्र युती करुन सार्वजनिक क्षेत्र दिवाळखोरीत निघाले असे सांगून ती मातीमोल किंमतीत बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे हस्तांतरीत केले आहे. जागतिकीकरणाच्या माध्यमातून महात्मा गांधींजीच्या या देशात राजकीय निती मुल्यांचे अध:पतन होवून राजकीय भ्रष्टाचार पोफावतांना दिसून येतो.

३)    जागतिकीकरणाचा तिसरा प्रभाव असा झाला की, जागतिकीकरणाच्या माध्यमातून राष्ट्र राज्य संकल्पना आता कालबाहय झाले असून ते आता लयास जाण्याच्या मार्गावर आहेत. जागतिकीकरणाच्या समर्थकांच्या मते जनतेचे किमान कल्याण साधण्यासाठी राष्ट्र राज्य व्यवस्थांची गरज उरली नाही. जनतेने स्वत:च आपले कल्याण करावे अशी त्यांची भुमिका आहे. सुसंघटीत समाज, राष्ट्र राज्य व्यवस्था मोडीत काढण्यासाठी धर्म, प्रांतवाद, जातीवाद, भाषावाद या तंत्राचा वापर करण्यांत येत आहे. जागतिक भांडवलशाही व्यवस्थेला राष्ट्र राज्य समाजरचना, शासन यंत्रणा कायमचे मोडीत काढून त्या ठिकाणी नविन जागतिक व्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. जागतिकीकरणाच्या रेटयात राष्ट्र राज्य व्यवस्था मोडीत निघून जगाची सर्व सत्तासुत्रे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी **(IMF)** जाण्याच्या मार्गावर आहेत.

४)    जागतिकीकरणाचा चौथा प्रभाव असा झाला की, भारताने नविन आर्थिक धोरणात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने घालून दिलेल्या अटी व शर्तीचा स्विकार केल्यामुळे भारताची रिझर्व्ह बँक केंद्र सरकारच्या नियंत्रणातून जवळ जवळ मुक्त झाली आहे. त्यामुळे याचा परिणाम असा झाला की, गरज भासेल तेंव्हा यापुर्वी केंद्र सरकार रिझर्व्ह बँकेला चलन छापन्याचा आदेश देत असे व ते रिझर्व्ह बँक अमलात आणत असे. परंतू आता रिझर्व्ह बँकेने किती चलन छापावे व केंद्र सरकारसाठी किती मर्यादेपर्यंत कर्जाजी उभारणी करावी यावर आंतरराष्ट्रीय नाणेनिधी निर्बंध घातले आहेत. म्हणून केंद्र सरकार आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या व जागतिक बँकेच्या हातचे बाहुले बनले आहे. यावरुन उपरोधीकपणे असे म्हणता येईल. जर आज महात्मा गांधी जिवंत राहिले असते तर मी ज्या भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती दिली तो भारत हाच आहे काय ? असा प्रश्न त्यांना पडल्याशिवाय राहिला नसता.

जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारतात विज्ञान तंत्रज्ञानाचा विकास, आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ, राहणीमानाचा दर्जा, परकिय चलन, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली असली तरी जागतिकीकरणामुळे भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक घटकांवर भयानक असे विपरीत परिणाम पडले आहेत. भारताच्या आर्थिक विकासासाठी जागतिकीकरण आवश्यक असले तरी राष्ट्रपुरूषांच्या विचाराकडे दुर्लक्ष होणार नाही. घटनेच्या स्वातंत्र्य, समता, बंधूभाव, न्याय या राजकीय मुल्यांची पायमल्ली होणार नाही याची दक्षता राजकारण्यांनी घेंतली पाहिजे अन्यथा जगातील विकसीत राष्ट्रांच्या आर्थिक फॅसिझमचा बळी भारत होईल आणि पुन्हा भारत पारतंत्र्यात किंवा गुलामीत ओढला जाईल यात शंकाच नाही. म्हणुन भारताने चीनचा आदर्श घ्यावा चीनने आपली अर्थव्यवस्था बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी खुली केली आहे. परंतू चीनने त्या बहुराष्ट्रीय कंपन्यांवर विशिष्ट अशी बंधने घातली आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांना ग्राहकोपयोगी किंवा चैनीच्या वस्तूच्या उत्पादनाऐवजी भांडवली मालाचे उत्पादन करण्याची परवानगी दिली. याचा परिणाम असा झाला की, चीन मधील लहान उद्योगधंदे किंवा देशी उद्योगधंदे बंद पडली नाहीत. म्हणुन भारताने चीनचा आदर्श घेवून बेलगाम बहुराष्ट्रीय कंपन्यांना लगाम घालून भारताचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधीत ठेवणे हे राज्यकर्त्यांचे आद्यकर्तव्य आहे.

**संदर्भसूची**


०१)    जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, **गजानन खातू , अक्षर प्रकाशन, मुंबई**

०२)    जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, **प्रा.जगन कराडे, डायमंड प्रकाशन**, पुणे

०३)    **जागतिकीकरण** नविन गुलामगिरी, **ॲडमीरल विष्णू भागवत, समता प्रकाश**, नागपूर

०४)    आंतरराष्ट्रीय संबंध, **डॉ.वसंत रायपूरकर, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर**